# परिचय

निसर्गातील विविध भाव भावनांचा अंतर्भाव असलेला सृजनशील अविष्कार म्हणजे “कला” होय. आणि असा अविष्कार जो निर्माण करतो तो “कलाकार”. या कलाकाराच्या संज्ञेत चपखल बसणारं नाव म्हणजेच “श्री सचिन नेवपूरकर”. औरंगाबाद येथे वास्तव्यास असणारे सचिनजी एक उत्तम शास्त्रीय गायकच नाही तर उत्तम बंदिशकार, संगीतकार आणि सुगम संगीतातील एक उत्तम गायक म्हणूनही त्यांची ओळख आहे. थोडक्यात काय, तर एका साच्यात बंदिस्त न राहता सृजनाकडे जाणाऱ्या अनेक सांगितीक वाटांवरून जात कलेच्या उच्चतम बिंदूकडे जाण्याचा त्यांचा प्रवास सुरूच असतो.

कलाकार जन्मतःच कलेचा अंश घेऊन जन्म घेत असला तरीही त्याला स्वतःतील तो अंश शोधून तो विकसित करावा लागतो. वयाच्या १७ व्या वर्षी गाणं शिकण्यास सुरवात करूनही त्यांनी आज संगीत जगतात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांच्यातील या सांगीतिक बीजाचे केवळ संवर्धन नाही तर त्याला खुलविण्याचं कार्य त्यांच्या सर्वच मान्यवर गुरूंनी केले. प्रथमतः त्यांचे सांगितीक शिक्षण औरंगाबाद येथील श्री विश्वनाथ दाशरथे यांच्या कडे सुरु झाले. त्यानंतर त्यांना श्री जगदीश गोडसे व मराठवाड्यातील संगीत क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व म्हणजेच पं. नाथराव नेरळकर यांचेही मार्गदर्शन लाभले. हे शिक्षण सुरु असतानाच ते पद्मविभूषण पं. जसराज यांच्या गायकीने अत्यंत प्रभावित झाले व त्यांची गायकी म्हणजेच “मेवाती” घराण्याची गायकी शिकण्याचा त्यांनी मानस केला. पं. जसराजजीं च्या शिष्या डॉ. शोभा अभ्यंकर या त्यांना गुरु म्हणून लाभल्या. त्यांच्याकडून मिळणाऱ्या संस्कारांमुळे मेवाती घराण्याची शैली सचिनजींच्या गाण्यात दिसू लागली. कालांतराने शोभा ताईंचे सुपुत्र व शिष्य आणि मेवाती घराण्याचे प्रस्थापित गायक पं. संजीव अभ्यंकर यांच्याकडेही तालीम घेण्यास सुरुवात केली. सर्वच घराण्याच्या गायकीतील सौंदर्यतत्वे कायमच सचिनजींना आकृष्ट करतात. जे जे सुंदर ते आपल्याला यायला हवे या जिज्ञासेपोटी आता ते ग्वाल्हेर घराण्याचे प्रसिद्ध व विद्वान गायक पद्मश्री पं. उल्हास कशाळकर यांच्या कडे सध्या तालीम घेत आहेत. असे अनेकोत्तम गुरु लाभल्यानंतर त्या बीजाचा वटवृक्ष व्हायला काय वेळ लागणार ? या मातब्बर गुरूंकडून मिळवलेली तालीम सचिनजींनी स्वकष्टाने केवळ स्वतःच्या गाण्यात उतरवली नाही तर आज ते अनेक शिष्य देखील घडवत आहेत व आपल्या ह्या अभिजात संगीताचा खऱ्या अर्थाने प्रचार व प्रसार करत आहेत.

“ध्यास परफॉर्मिंग आर्टस्” ही सचिनजींची संस्था २००४ सालापासून औरंगाबाद येथे कार्यरत आहे. त्यात आजवर शेकडो विद्यार्थ्यांनी संगीताचे प्रशिक्षण घेतले असून सध्या भारत व परदेशातील अनेक विद्यार्थी प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन स्वरूपात शिक्षण घेत आहेत. या संस्थेअंतर्गत सचिनजी “शास्त्रीय संगीताचे” तसेच त्यांच्या पत्नी सौ. केतकी नेवपूरकर “भरतनाट्यम्” चे प्रशिक्षण देत आहेत.

खरा कलाकार तोच मानला जातो जो कलेप्रती केवळ वैयक्तिकच नाही तर सामाजिक भान देखील राखतो. विद्यादाना व्यतिरिक्त अनेक संगीत महोत्सवांच्या रुपातूनही सचिनजी शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहेत. शास्त्रीय संगीताचे अध्ययन सुरु असताना पद्मश्री पं. जितेंद्र अभिषेकी बुवांच्या गायकीनेही ते प्रेरित झाले. म्हणूनच त्यांच्या स्मृतीत “पंडित जितेंद्र अभिषेकी स्मृती संगीत महोत्सव”, स्वतःच्या गुरूंच्या स्मृतीत “गानगुरु डॉ. शोभा अभ्यंकर संगीत महोत्सव” तसेच “स्वराध्यास” ही अनोखी छोटेखानी मैफिल, या विविध स्वरूपात ते रसिकांसाठी सांगीतिक पर्वणी देतात.

विद्याग्रहण, विद्यादान आणि संगीतकलेप्रती असलेलं सामाजिक भान यामुळे श्री सचिन नेवपूरकर यांच्याकडे एक बहूआयामी तसेच आश्वासक व्यक्तिमत्व म्हणून पाहिलं जातं.

## अध्यापन क्षेत्रातील कार्य

- ☆ देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे ५ वर्षे संगीत विभाग प्रमुख म्हणून कार्यरत .
- ☆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २ वर्षे संगीत प्राध्यापक (visiting faculty)
- ☆ २००४ पासून "ध्यास परफॉर्मिंग आर्टस्" या स्वनिर्मित संस्थेत शिक्षण देण्याचे अविरत कार्य सुरु.

## पुरस्कार व प्राप्ती

- ☆ पुणे विद्यापीठातून संगीतातील पदव्युत्तर शिक्षण प्राप्त
- ☆ अखिल भारतीय गंधर्व महामंडळातून संगीत अलंकार पदवी प्राप्त
- ☆ सर्वांकष अकॅडमी तर्फे "युवा स्पंदन पुरस्कार" प्राप्त साल २०००.
- ☆ केंद्र सरकार शिष्य वृत्ती प्राप्त - २००३
- ☆ संगीत कलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर पुरस्काराने सन्मानित २०१४.
- ☆ पं. अप्पासाहेब जळगावकर पुरस्काराचे मानकरी २०१६.
- ☆ "कलाश्री पुरस्कार" प्राप्त २०१९.

## अल्बम्स

- ☆ "तुझ्या नामाचा रे संग" हा अभंगांचा अल्बम प्रकाशित.
- ☆ "जियरा" या अल्बम मध्ये सचिनजींनी रचलेल्या बंदिशींना पं. संजीव अभ्यंकर यांनी स्वर साज चढवला आहे.
- ☆ "स्वरचित" ही त्यांनी रचलेल्या बंदिशींची मालिका युट्युब वरील त्यांच्या अधिकृत चॅनेल वर उपलब्ध.
- ☆ या व्यतिरिक्त त्यांचे अनेक सिंगल्स युट्युब वर प्रकाशीत.